**नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ संचालित**

# कला व वाणिज्य महाविद्यालय सिन्नर

## राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत

## विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबीर

**१५ जानेवारी ते २१ जानेवारी २०२५**

**शिबीर स्थळ - लोणारवाडी, ता- सिन्नर.**

लोणारवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर उद्घाटन सोहळा संपन्न झाला. नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या सिन्नर येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन बुधवार दि. १५ जानेवारी २०२५ रोजी मा. श्री. एम.जि. कुलकर्णी (कार्याध्यक्ष नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ, नाशिक) यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांनी ७ दिवसाच्या शिबिरामध्ये स्वतःवर प्रथमतः श्रम संस्कार करून घ्यावेत. असे मार्गदर्शन केले. तसेच लोणारवाडी येथील सरपंच मा. सौ. जयश्रीताई लोणारे यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण गावाचे सहकार्य असल्याचे आश्वासन दिले. मा. श्री बापूसाहेब पंडित (अध्यक्ष महाविद्यालयीन विकास समिती) यांनी विद्यार्थ्यांना ७ दिवस करावयाच्या कामासंबंधित मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. विनोद निरभवणे यांनी शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी गावाच्या प्रश्नाविषयी अभ्यास करावा, व गावातील सामाजिक, शिक्षण, आरोग्य, आर्थिक ई. समस्यांची माहिती करून घ्यावी असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.महेश शिंदे (विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी), सूत्रसंचालन प्रा.राजश्री बागुल (राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी) यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. धनश्री गांगुर्डे यांनी केले.

उद्घाटन कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी गावात फेरफटका मारून गावातील ग्रामस्थांशी हितगुज केले. त्यानंतर दुपारी दोन वाजता वैचारिक प्रबोधनासाठी प्रा. प्रकाश वारकरी यांनी विद्यार्थ्यांना ‘आपण आणि आपले कुटुंब व डिजिटल भारत’ या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

शिबिराच्या दुसऱ्या दिवशी दि. १६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ६:०० वाजता शिबिराची सुरुवार राष्ट्रगीत व राष्ट्रीय सेवा योजना या गीताने झाली. त्यानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लोणारवाडी येथील शाळेच्या मैदानाचे सपाटीकरण करण्यात आले. पुन्हा दुपारी २:०० वाजता प्रा. डॉ. दिपक शिंदे यांनी 'शाश्वत विकास स्त्री-पुरुषांचा व महिलांची जमीन मालकी' या विषयावर वैचारिक प्रबोधन केले. त्यानंतर संध्याकाळच्या वेळी मुलांनी 'महिला सक्षमीकरण' या विषयावरील  गावकऱ्या समोर पथनाट्य सादर केले.

शिबिराच्या तिसऱ्या दिवशी दि. १७ जानेवारी २०२५ रोजी नियमितपणे शिबिराची सुरुवात झाली. नंतर  गावात घरोघरी जाऊन स्वयंसेवकांनी  गावकऱ्यांना स्वच्छतेचे व पाणी बचतीचे महत्व पटवून दिले. त्यानंतर दुपारच्या सत्रात मा. श्री. अविनाश नेवे यांनी 'ग्रामविकास व लिंग भाव संवेदनशीलता' या विषयावर विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले.

शिबिराच्या चौथ्या दिवशी दि. १८ जानेवारी २०२५ रोजी आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालय व श्रीगुरुजी रुग्णालयातर्फे 'सर्वरोग निदान शिबीर' राबविण्यात आले. या शिबिरामध्ये नेत्ररोग, अस्थिरोग, स्रीरोग, फिजिशियन, त्वचारोग, दान्तचिक्कीसा, बालरोग कॅन्सर इ. आजारांवर मोफत मार्गदर्शन करण्यात आले. लोणारवाडी या गावातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात या शिबिरास भेट देवून आरोग्य तपासणी करून घेतली. दुपारच्या सत्रात मा. श्री. कृष्णाजी घरोटे यांनी 'मूल्यशिक्षण' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यान दिले.

शिबिराच्या पाचव्या दिवशी दि. १९ जानेवारी २०२५ रोजी प. पु. पांडुरंगशास्त्री आठवले विद्यापीठ,लोणारवाडी शास्त्रीनगर येथे स्वयंसेवकांसमवेत प्राध्यापकांनी भेट दिली. व त्या विद्यापीठाची माहिती घेण्यात आली. जवळपास पाच राज्यातील विद्यार्थी येथे येतात. चाळीस देशांतून हे विद्यार्थी या विद्यापीठात प्रवेश घेतात. प्रवेश घेणारा प्रत्येक विद्यार्थी स्वाध्याय परिवारातून आलेला असावा असे नियम विद्यापीठाने घालून दिलेले आहे. दुपारच्या सत्रात मा. श्री. योगेश शिंदे यांनी 'शासकीय योजनांमधून सामाजिक' कार्य कसे करावे याबद्दल माहिती दिली.

शिबिराच्या सहाव्या दिवशी दि. २० जानेवारी २०२५ रोजी स्वयंसेवकांनी शैक्षणिक कुटुंब सर्वेक्षण २०२५ - २६ अंतर्गत लोणारवाडी गावातील २५० ग्रामस्तांच्या घरोघरी जाऊन शैक्षणिक, आर्थिक, सामाजिकदृष्ट्या सर्वेक्षण केले. दुपारच्या सत्रात मा.शिवराज सोनवणे (प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण संस्था,सिन्नर) यांनी उद्योग व उद्योजकता या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. तसेच नोकरी व उद्योजकता यातील महत्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली. सायंकाळच्या सत्रात लोणारवाडी गावातील ग्रामस्थांसाठी व्यसनमुक्ती व स्त्री शिक्षण काळाची गरज या विषयांवर पथनाट्य सादर केले व काही स्वयंसेवकांनी ग्रामस्वच्छता या विषयावर पोवाडा सादर केला.

शिबिराचा सातवा दिवस दि. २१ जानेवारी २०२५ रोजी समारोपाच्या दिवशी नियमितपणे दिनक्रम झाल्यानंतर गावातील ‘वज्रेश्वरी देवी मंदिर’ परिसरात स्वच्छता करण्यात आली. त्यानंतर ‘जि. प. प्राथमिक शाळा वडगाव’ सिन्नर, जि नाशिक या शाळेला भेट देवून स्वयंसेवकानी तेथे विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. तसेच तेथील शाळेतील विद्यार्थ्यांनी देखील गायन व नृत्याचे सादरीकरण केले.

सायंकाळी शिबीर समारोप कार्यक्रमामध्ये कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. विजयकुमार पंडित (अध्यक्ष महाविद्यालयीन विकास समिती) तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा.विवेक जुन्नरे (उपाध्यक्ष,नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ, नाशिक) मा.सदाशिव शंकर लोणारे (माजी सरपंच, लोणारवाडी ग्रामपंचायत), मा.दिपक पांगारकर (मुख्याध्यापक, जि.प.शाळा,लोणारवाडी, मा.कैलास गोळेसर (उपसरपंच,लोणारवाडी), मा. विक्रम भगत (पोलीस पाटील, लोणारवाडी), डॉ.विनोद निरभवणे (प्रभारी प्राचार्य), ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील ग्रामस्थ व महाविद्यालायचे प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या रोहिदास कुमावत, शिवराज गांगुर्डे, स्नेहा पाबळे, कार्तिकी गाडेकर या स्वयंसेवकांनी सात दिवसीय विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरादरम्यान घेतलेला अनुभव सर्वांसमोर मांडला. तसेच विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.महेश शिंदे यांनी प्रातिनिधिक स्वरूपात मनोगत व्यक्त केले.

सदर विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराच्या यशस्वीतेसाठी रा.से.यो कार्यक्रम अधिकारी प्रा.राजश्री बागुल, विदार्थी विकास अधिकारी प्रा.महेश शिंदे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.सुनील गुरुळे, प्रा.रेखा वरंदळ, प्रा.वर्षा गरगटे, प्रा.धनश्री गांगुर्डे, प्रा.कावेरी गोसावी, आणि प्रमोद आंबेकर, संतोष डुंबरे, योगेश गोसावी इत्यादींनी अथक परिश्रम घेतले.

अशा पध्दतीने सात दिवसीय विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर राबविण्यात आले.

प्रा. राजश्री बागुल
(रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी)